महाराष्ट्र शासन

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई

दुरध्वनी क्र.०२२- ३५१०२८८५
Email. ID.-mumbairangbhumi@gmail.com

२ रा मजला ठाकरसी हाऊस, शुरजी
वल्लभदास मार्ग,बेलार्ड इस्टेट,मुंबई -४०० ००१

जा.क्र. रंप्रपम/VM २०४७/ 2424/२०२५ दिनांक :- 14/05/2025

वाचा :- विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत १५० दिवस उपक्रम - विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना.

:: परिपत्रक ::

विषय :- विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत विकसित महाराष्ट्र Vision Document तयार करण्यासाठी नागरिकांकडून सुचना मागविणेबाबत.

विकसित महाराष्ट्र २०४७ या उपक्रमाअंतर्गत Vision Document तयार करण्याबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. त्यात खालीलप्रमाणे तीन भाग आहेत.

१. Long-term Vision of १५ August २०४७ (Bharat @ १००)
२. Medium-term Vision of १ May २०३५ (Maharashtra@७५)
३. Short-term Vision of २ October २०२९ (With Annual targets)

वरील प्रमाणे Vision Document तयार करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार या कार्यालयात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. माहे मे २०२५ पासून ते ०२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत या १५० दिवसांत महाराष्ट्र राज्य रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयास खालील ३ मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे.

अ. विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document
ब. e- Governance Reforms
क. सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा

उपरोक्त "अ" प्रमाणे विकसित महाराष्ट्र २०४७ Vision Document तयार करण्यासाठी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या कार्य क्षेत्राशी ( नाटय संहिता पूर्वपरिक्षणाच्या पध्दतीमध्ये अपेक्षित बदल,टप्पे, कार्यसुलभता, AI / तसेच इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी ) संबंधित भविष्यात होणारे बदल विचारात घेऊन त्या अनुषंगाने आवश्यक त्या अपेक्षित सुधारणाच्या अंमलबजावणीसाठी नाटय क्षेत्राशी सबंधित नागरिकांकडून नाविन्यपुर्ण सुचना या परिपत्रकाद्वारे मागविण्यात येत आहेत.

सदर सुचनांवर समितीतील तज्ञांची चर्चा होऊन अंतिम आहवाल तयार करून तो शासनास सादर करण्यात येणार आहे.

रंगभूमी/नाटय क्षेत्राशी संबंधित अभिप्राय/सूचना नागरिकांनी या कार्यालयाच्या mumbarangbhumi@gmail.com या ईमेलवर तसेच https://rangbhumi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ( अभिप्राय या शिर्षकाखाली) दि. १५ जून, २०२५ पर्यंत पाठविण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

( सं. पु. खामकर )
सचिव,
रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई